॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेल्या पूज्य सानेगुरूजी संस्कार केंद्रातर्फे साने गुरूजींचा विचारांवर आधारीत लघुपट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच इतरही सर्व नागरिकांसाठी खुली आहे. लघुपटाचा कालावधी पाच ते दहा मिनिटे असावा. लघुपटासाठी सात विषय देण्यात आले आहेत. त्यामध्ये १) मातृहृदयी साने गुरूजी, २) मानवतावादी साने गुरूजी, ३) समाजवास्तव आणि मानवतावाद, ४) माणूस, माणूसकी आणि मानवतावाद, ५) साने गुरूजींच्या साहित्यातील करूणाभाव, ६) साने गुरूजींचे जीवन व कार्य, ७) साने गुरूजींच्या कथा : आजच्या काळातील प्रासंगिकता या विषयांचा समावेश आहे. लघुपटाच्या संचिकेचे स्वरूप HD- Quality (750p / 1080p) आणि Mp4 स्वरूप असावे. मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत उपशिर्षके असावित स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. भाग घेणाऱ्यांनी प्रारंभी rohankoshti5@yahoo.co.in या मेलवर माहिती कळवावी. परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील. २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत लघुपट पाठविता येईल. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रू. ७५००, द्वितीय – रू. ५०००, तृतीय – रू. ३०००, उत्तेजनार्थ (दोन) रू. १५००. अधिक माहितीसाठी 8055331264 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन विभाग प्रमुख डॉ. रोहन कोष्टी यांनी केले आहे.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २४ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत आयोजित करण्यात आलेल्या युवती महासभेचा समारोप मोठ्या उत्साहात झाला.

दि. १७ ते २३ जानेवारी पर्यंत झालेल्या या युवती सभेत महिला सशक्तीकरण, सबलीकरण व आत्मनिर्भरता यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शारदा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. चेतना नन्नवरे व सहायक पोलीस निरीक्षक माधुरी बोरसे यांच्या प्रमुख उपस्थितीत या महासभेचे उद्घाटन झाले. दि. १८ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या उद्यान निरीक्षक अश्विनी पाटील यांनी कुक्कुट पालन, पशपालन यामधील करीअरच्या संधीबाबत मार्गदर्शन केले. दि. २२ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात युवतींची आरोग्य तपासणी करण्यात आली. दि. २३ जानेवारी रोजी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांच्या उपस्थितीत या युवती महासभेचा समारोप झाला. प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे अध्यक्षस्थानी होत्या. या समारंभात प्रा. रमेश सरदार, डॉ. आर.आर. चव्हाण, प्रा. अश्विनी मुंदडा, डॉ. अनिल बारेकर व विभागातील विद्यार्थिनी उपस्थिती होत्या.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २४ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी